REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# मुस्लीम धर्मातील महिलांच्या विवाह व घटस्फोट विषयक कायदयाचे चिकित्सक अध्ययन

डॉ. मनिषा यादव
श्री. गाडगे महाराज महाविद्यालय मुर्तिजापूर.

## प्रस्तावना :-



संयुक्त राष्ट्र संघाने स्त्री - पुरुषाकरीता मानवी हक्काचा जाहिरनामा तयार केला पण वास्तवामध्ये स्त्रीयांच्या मानवाधिकाराचा विचार कोणत्याही देश, धर्म, संस्कृती मध्ये खुप कमी प्रमाणात केलेला दिसतो, याला भारतातील हिंदू व मुस्लीम धर्म अपवाद नाहीत. हिंदू संस्कृतीमध्ये विवाह हा एक संस्कार आहे. तो केल्याशिवाय मानवी जीवनाचे संस्कार पूर्ण होत नाहीत, पण मुस्लीम धर्मामध्ये विवाहाला करार मानले आहे व हा करार 'प्रस्ताव व स्विकृती' आवश्यक मानतो, जो पर्यत वधू वर विवाह प्रस्ताव स्वतः मान्य करीत नाहीत तो पर्यत विवाह होत नाही, तसेच या विवाहास संमती देण्याकरीता दोन साक्षीदारही असणे गरजेचे आहे यामध्ये वधू वर अल्पवयीन असतील तर पालक अशा प्रकारचा करार करु शकतात. मुस्लीम धर्मात महमद पैंगबरानी विवाह, तलाक, बहुपत्नीत्व, पत्नीचे पालनपोषण इत्यादी बाबत कायदे केले आहेत. त्यामुळे या कायदयाला धर्माची जोड असलेली दिसून येते. हिंदूसाठी हिंदू कायदा त्याचप्रमाणे मुसलमानाकरीता मुस्लीम व्यक्तीगत कायदे निर्माण झाले त्यामुळे विवाह, घटस्फोट, दत्तक, वारसा इ. बाबत समान नागरीक कायदा सर्व धर्मियाकरीता प्रत्यक्षात येणे दुर्लक्ष वाटते. धर्मानुसार कायदयाची संकल्पना प्रत्येकाची वेगवेगळी असल्याने एका धर्मातील नियम दुसऱ्या धर्माकरीता निरुपयोगी ठरतात. हिंदू धर्मात स्त्रीला असलेला पोटगी मिळवण्याचा अधिकार मात्र मुस्लीम धर्मात निरुपयोगी ठरताना दिसतो म्हणूनच मग शहाबानो ते शायराबानो प्रकरणे समोर येतात. न्यायव्यवस्था ही स्वतंत्र असूनही शहाबानो ते सायराबानो प्रकरणात अपयशी ठरल्याप्रमाणे वाटतात. स्त्रीचा विचार हा ती 'स्त्री' कोणत्या धर्मातील आहे असा न करता ती एक 'स्त्री' आहे असा विचार करुन राज्यघटनेच्या माध्यमातून तिच्या मानवी अधिकारांचे जतन झाल्यास शहाबानो ते सायराबानो प्रकरण होणार नाहीत.

## संशोधनाची उद्दिष्टये :-

१) मुस्लीम धर्मातील विवाह विषयक कायदयाचा अभ्यास करणे
२) मुस्लीम धर्मातील तलाक पध्दतीचा अभ्यास करणे.
३) शहाबानो प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करणे.
४)मुस्लीम धर्मातील विवाह संपुष्ठात आणण्याच्या कायदा १९३९ चे अध्ययन करणे.
५)मुस्लीम धर्मातील बहुपत्नीत्व प्रथेचा अभ्यास करणे.

## संशाधेनाची गृहितके :-

१)मुस्लीम धर्मात विवाहामध्ये मेहेर याला महत्व आहे.
२)मुस्लीम धर्मात पत्नीलाही घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे.
३) शहाबानो प्रकरणामध्ये न्यायव्यवस्था अपयशी ठरली.
४) मुस्लीम धर्मात तलाकचा अधिकार फक्त पुरुषाना आहे.
५)संविधानाने तोंडी तलाक अवैध ठरवला आहे.
६)मुस्लीम धर्मात बहुपत्नीत्वाचे प्रमाण अल्प आहे.

## इस्लाम व स्त्री अर्थाजन :-

इस्लामध्ये स्त्रीलाअर्थाजन करण्याचे स्वातंत्र्य नाही त्या ऐवजी तिने पारीवारीक जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडण्यात याला महत्व दिल्याचे दिसते इस्लामने पुरुषावरच स्त्रीची अर्थिक जबाबदारी टाकली आहे. त्यानुसार पत्नीचा 'नफका' म्हणजे जीवनावश्यक गरजा पूर्ण करणे पुरुषाचे कर्तव्य सांगितले आहे याचा उल्लेख 'हदीस' व महमंद पैगंबराच्या 'हज्जतुल विदा' मध्ये आढळतो इस्लामने स्त्रीला आई, वडील, पती, संतती याच्या संपत्तीमध्ये अधिकार दिला आहे पण प्रत्यक्षात

LBP PUBLICATION

मात्र तो मिळत नाही मेहर व्यतीरिक्त कोणतीही संपत्ती तिला मिळत नाही.

### मेहर :-

लग्नामध्ये पती कडून पत्नीस मिळणारी रक्कम म्हणजे मेहर होय. याची मालकी पत्नीची असते त्यामुळे तो तिचा वैधानिक अधिकार आहे स्त्री मेहरची रक्कम पुर्णपणे वसूल करु शकते किंवा त्यामध्ये कपात करु शकते, माफ करु शकते. स्त्री जर आपणहून मेहर चा काही भाग पुरुषाला परत करत असेल तर तो करण्याचा तिला अधिकार आहे वधू वरामध्ये शाररिक संबध प्रस्थापित होण्यापुर्वी किंवा झाल्यानंतर मेहर निश्चित होतो अथवा होत नाही मेहर साठी 'अजोर' हा शब्द ही वापरला जातो मेहर किती असावा हा पत्ती पत्नीची सामाजिक, आर्थिक, पारिवारीक स्थितीवर आधारीत असतो शरीयतने मेहरची किमान रक्कम निश्चित केलेली दिसते दिव्य कुराआनामध्ये ही स्त्रीया बाबात मेहर चा उल्लेख आढळतो.

### बहुपत्नीत्व व तलाक :-

इस्लाम मध्ये बहुपत्नीत्व मान्य आहे पण भोग विलासा करीता अमान्य केले आहे. इस्लामने बहुपत्नीत्व मान्य केले असले तरी चार पत्नीची मर्यादा घातली आहे बहुसंख्य स्त्रीयाशी विवाह करावयाचा व त्याचे पालनपोषण करता येत नसेल तर इस्लाम त्यास विरोध करतो पती हा आदेश नाही तर विशिष्ठ परिस्थिती मध्ये केलेली ही एक उपाय योजना असलेली दिसते. इस्लामने तलाकचा अधिकार फक्त पुरुषांना देऊन स्त्रीवर अन्याय केलेला दिसतो.

इस्लाम धर्माचे शरीयत हे धर्मशास्त्र असून विवाह, कुंटुब घटस्फोट वारसा हक्क, स्वच्छता इ बाबतचे नियम शरियत मध्ये आहेत. त्याच प्रमाणे कुराण व हदीसमध्ये सामाजिक जीवन जगत असतानाचे नियम सांगितले आहेत ब्रिटिशंनी १८६२ मध्ये हिंदू करीता इंडियन पिनल कोड व १९३६ मध्ये मुस्लीम करीता 'मुस्लीम वैयक्तीक कायदा' पास केला होता.

कारण अर्थाजन करणारा पुरुष असल्याने व स्त्री पुरुषावर अवलंबुन असल्याने तलाक अधिकार फक्त पुरुषाला मिळतात. अरबा मध्ये स्त्रीयाना प्रथम तलाख देऊन नंतर 'रुजुअ' करीत असत त्या मध्ये तलाक दोन वेळाच दयावा त्यामध्ये 'रुजुऊ' करता येते पण तीन तालाखच्या दिर्घ मुदतीत मात्र स्त्रीचा मानसिक छळ होताना दिसतो त्यामुळे तिला कोणतेही अधिकार मिळत नाहीत. पतीने पत्नीला तीन वेळा तलाक दिल्यास तिला परत विवाह बंधतात येता येत नाही. 'इद्दतचा' काळ संपल्यानंतर तिला दुसऱ्यासोबत विवाह करण्याचा अधिकार मिळतो दुसऱ्या मधील स्त्रीला तलाक नंतर 'मताऊ' (थोडेसे सामान किंवा धनसंपत्ती) मिळते पण त्यास आजीवन पोटगी म्हणता येत नाही व तो नफक ही नसतो त्यामुळे इस्लाम स्त्री तलाक नंतर अक्षरशा वाऱ्यावर येते आपला व मुलांचा उदरनिर्वाह कसा करावा हा प्रश्न उभा राहतो त्यामुळे शरीयत व मुस्लीम पर्सनल लॉ ऐवजी तीला न्यायव्यवस्था व राज्यघना जवळची वाटत.

मुस्लीमधर्मात पतीकडून पत्नीला मिळणाऱ्या रक्कमेला मेहर असे म्हणतात मेहर याचा अर्थ स्त्रीधन आहे. व तो लैंगिक सुखासाठी तिला दिलेले मुल्य असा अर्थ सांगीतला जातो. मेहर हा पत्नीच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असतो विवाह संपुष्ठात आल्यास त्याचे महत्व अधोरेखित होते. मुस्लीम धर्मात तलाकचा अधिकार हा फक्त पुरुषाला आहे व तो कोणतेही कारण सांगुन कधीही, कुठेही, केव्हाही तलाक देऊ शकतो. तलाक हा फोन वरुन तोंडी, लेखी असाही दिल्याची उदाहरणे आढळतात. या तलाक मध्ये तलाक -उस - सुलमान व तलाक -उल-बिदा असे प्रकार आहेत. वधू वर परस्पर संमत्तीने खुल किंवा खुल्ला, मुबारा किंवा मुबारात या प्रकारे ही घटस्फोट घेऊ शकतात. कायदयाच्या माध्यमातून लियान, जिहार, इला या प्रक्रियेने विवाह हा करार संपुष्ठात आणता येतो शिया व सुफी पंथामध्ये विवाह करार संपुष्ठात न येता ही वधू 'घटस्फोट मागू शकते. मुस्लीम धर्मातील आयतीमध्ये पुरुषांनी एकाच स्त्रीशी विवाह करण्याचा संदर्भ आढळतो, तरी ही या धर्मातील बहुपत्नीत्वाबाबतच्या संकल्पने बाबत मात्र मत व मतांतरे आढळताना दिसून येतात चार विवाहाचे बंधन पुरुषांवर असले तर भोगविलासाकरीता विवाह केल्याच्याही नोंदी आढळतात. विशिष्ठ परिस्थितीमध्य बहुपत्नीत्व योग्य असले तरी वर्तमान परिस्थितीमध्ये बहुपत्नीत्वाचे समर्थन करता येत नाही

### मुस्लीम विवाह संपुष्ठात आणण्याचा कायदा १९३९ :-

या कायदयानुसार स्त्री ही घटस्फोट मागू शकते या कायदयानुसार मुस्लीम स्त्रीला पुढील अधिकार प्राप्त होतात.

१) पती बेपत्ता असणे
२) पत्नीचे पालन पोषण करण्यात पतीने दुर्लक्ष करणे.
३) पती नपुसंग असल्यास
४) पती असाध्य आजाराने त्रस्त असेल तर
५) पतीकडून पत्नीचा शाररीक मानसिक छळ होत असेल तर
६) पतीचे इतर स्त्रीयांशी अनैतिक संबंध असतील तर इत्यादी कारणावरुन मुस्लीम विवाह संपुष्ठात येतो.

**शाहबानो ते शायराबानो खटला :-**

१९८६ मध्ये शाहबानो खटल्यादरम्यान सर्वोच्च न्यायालयाने पोटगीबाबतचा दिलेला निर्णय राजीव गांधी सरकारने बहुमताच्या आधारावर व आपली व्होट बॅक सुरक्षित रहावी म्हणून फिरवला होता त्यामुळे फक्त शहाबानोच नाही तर तमाम मुस्लीम धर्मातील स्त्रीयावर अन्याय झाला पतीने तलाक दिल्यानंतर त्या महिलेने आपला चरितार्थ, उत्पादनाचे कोणतेही साधने नसताना कसा चालवावा हा ब्रम्हप्रश्न निरुत्तर झालेला दिसतो. शहाबानो बाबत झालेला प्रकार ही नंतर आफरिन रहमान, आसीया साबरी, इशरत जहॉ, गुलशन परवीन या महिलाबाबत झालेला दिसतो या चौघीनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या खटल्यानुसार २२ ऑगस्ट २०१७ रोजी सर्वोच्च न्यायालयाने तिहेरी तलाक इस्लामचा भाग नाही, भारतीय राज्यघटनेनुसार तो अवैध ठरतो असा निर्णय दिला. या खटल्याच्या विरोधात मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड असल्याचे दिसून आले आहे. तलाक हा शरीयत चा भाग नसल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत होत असले तरी तलाखचा मुद्दा आतून सूटल्यासारखे चिन्ह दिसत नाही कारण त्यास उचित अशा कायदयाचे स्वरुप प्राप्त होऊ शकलेले नाही त्यामुळे राज्यघटनेच्या माध्यमातून धार्मिकतेची बंधने नाकारुन प्रत्येकासाठी एक समान कायदा करणे महत्वाचे ठरते. शायराबानो प्रकरणात हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, पारशी धर्मातील न्यायमूर्ती होते दिलेला निर्णय हा तीन विरुध्द दोन न्यायाधीश असा असला तरी तो सर्वोच्च न्यायालयाच्या ‘अभिलेख न्यायालय’संकल्पनेनुसार तो अंतिम व इतर न्यायालयावर बंधनकारक व मार्गदर्शक असलेला दिसून येतो. त्यामुळे शायराबानो असो की शहाबानो त्यांना दिलेला तलाक हा संवैधानिक तरतूदीनुसार अवैध असलेला दिसून येतो.

**निष्कर्ष :-**

इस्लाम धर्मातील स्त्रीयांच्या विवाह व घटस्फोट विषयक कायदयाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की स्त्रीला विवाह स्विकृत करण्याचा अधिकार आहे, पण तलाकचा अधिकार फक्त पुरुषला आहे. राज्यघटनेच्या माध्यतातुन समान नागरीक कायदा होऊ  न शकल्याने विविध धर्मात विवाह, घटस्फोट, वारसा बाबातचे वेगवेगळे कायदे आढळतात.  त्यामुळे समान नागरी कायदा संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकत नाही त्याकरीता सर्वासाठी एकच कायदा करणे महत्वाचे आहे. इस्लाम मध्ये स्त्रीयाकरीता कायदे असले तरी स्त्रीयांची होणारी बदनामी यामुळे त्या इस्लाम विरोधात एखादे पाऊल उचलण्यास बहुसंख्य स्त्रीया तयार होत नाहीत, भारतीय न्यायव्यवस्थेने तोंडी तलाक अवैध ठरवुन पुरोगामी पाऊल उचललेले आहे, त्यामुळे भविष्यात मुस्लिम महिलांच्या पोटगी संदर्भात निश्चितच सकारात्मक कार्य होईल.

**संदर्भ :-**


१) भारतीय स्त्री आणि मानवधिकार- डॉ. स्मीता मेहेत्रे, साईनाथ प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती जुलै २०११

२) हिंदू वारसा अधिनियम १९५६ - के.के. गुजर, चौधरी लॉ पब्लीशन हाऊस पुणे, व्दितीय आवृती २०१४

३) मुस्लिम स्त्रीचे अधिकार व त्यातील आक्षेपाचा आढावा - सय्यद जलालुद्दीन उमरी, इस्लामीक मराठी पब्लीकेशन ट्रस्ट, व्दितीय आवृत्ती २०१४

४) साधना साप्ताहिक ९ सप्टे २०१७.

५) भारतातील धर्म - कुलकर्णी पी.के. पुर्नमुद्रण सप्टेंबर २००१ विदयाभारती प्रकाशन, लातुर.

६) भारतीय सामाजिक समस्याऐ - जोशी ओ. पी., नवीन संस्कार १९७१, पद्म बुक कंपनी जयपूर

७) सामाजिक संशोधन पध्दती - बोधनकर डॉ. सुधीर प्रा विवेक अलोणी, दुसरी आवृत्ती १९९९, श्रीसाईनाथ प्रकाशन नागपुर.

८) आधुनिक जगाचा इस्लाम- इंजिनिअर डॉ. असगर अली, अनवांद नंदिनी चव्हाण, प्रथमावृत्ी प्रो २०१२ असर प्रकाशन मुंबई.

९) भारतीय मुसलमान- प्रा मुजीब संक्षिप्त अनुवाद श्री. वसंत नगरकर, प्रथमावृत्ती एप्रिल १९८९, प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई.

१०) महाराष्ट्र विधानसभेतील महिला सदस्यांचा याच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, व आर्थिक पार्श्वभूमीचे चिकित्सक अध्ययन विशेष संदर्भ  अकरावी व बारावी विधानसभा, डॉ. मनिषा यादव यांचा अप्रकाशित प्रबंध मे २०१८.

११) स्त्री - जाने २००९ डॉ. मंगला आठलेकर यांचा धर्मानेच दिले गौणत्व लेख.